# २०. सर्व विश्वचि व्हावे सुखी

**डॉ. यशवंत पाठक** (१९४८) :

ललित लेखक व प्राध्यापक. मराठी संतसाहित्य आणि लोकजीवन, लोककला व लोकसंस्कृती या गोष्टींशी असलेल्या आंतरिक जिव्हाळ्यातून डॉ. पाठक यांचे सर्व लेखन निर्माण झाले आहे. 'नाचू कीर्तनाचे रंगी', 'ब्रह्मगिरीची सावली', 'मातीचं देणं' हे ललित लेखसंग्रह; 'नक्षत्रांची नाती' हे व्यक्तिचित्र; 'स्पंदने श्रीसमर्थाची', 'तुकारामांचे अभंग', 'निरंजनाचे माहेर' ही समीक्षात्मक पुस्तके; 'आभाळाचे अनुष्ठान' हा कथासंग्रह इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. पुणे विद्यापीठाच्या ज्ञानेश्वर अध्यासनाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे.

'हे विश्वचि माझे घर' या संत ज्ञानेश्वरांच्या वचनाचा प्रत्यय आज तंत्रयुगात आपण घेत आहोत. दळणवळण आणि संपर्काच्या आधुनिक साधनांनी 'वैश्विक खेड्याची' संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. गाव ते जग या स्तरावर माणूस माणसाला भेटतो. तो जवळ यावा, जोडला जावा. एकेक माणूस जोडला, माणसे मनाने जवळ आली, की अवघी मानवता सुखी होईल. संतांच्या वाङ्मयातील हाच विचार अतिशय परिणामकारकरीत्या प्रस्तुत पाठात मांडला आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत म्हणजे सत्पुरुष. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती परउपकारें ।' ही संतांची खरी भूमिका आहे. संतांच्या साहित्याचा आत्मा भक्तीबरोबरच समाजप्रबोधन, समाजकल्याण हा आहे. संत परमेश्वराकडे स्वत:साठी काहीही मागत नाहीत; परंतु 'बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणउनि ।।' यासाठी श्री चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, वारकरी संप्रदायातील सर्व संत, संत कबीर, गुरुनानक, संत महात्मा बसवेश्वर अशा सर्वच संतांनी आपल्या साहित्यातून विश्वकल्याणासाठी परमेश्वराकडे, गुरूंकडे साकडे घातले आहे.

संत ज्ञानेश्वरांपासून अगदी आधुनिक काळातील संत गाडगेबाबा यांच्यापर्यंत सर्वच संतांच्या प्रार्थना म्हणजे मानवतेचा आविष्कार आहेत. त्यांच्या प्रार्थनेमध्ये विश्वकल्याण, माणुसकी व सहृदयता यांचे प्रतिबिंब दिसते. माणसाच्या मनातील माणुसकीचा झरा जिवंत असेल तरच विश्वकल्याण शक्य आहे, कारण 'मी' पासून 'आम्ही' या संकल्पनेप्रमाणे 'अवघे विश्वचि माझे घर', 'वसुधैव कुटुम्बकम्' या संकल्पना संतांच्या साहित्यातून प्रकट झाल्या आहेत. सर्व संतांच्या प्रार्थनेतील साधर्म्याचा धागा 'विश्वकल्याण' याचा परिचय या पाठातून करून घेऊया.

संत ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात पसायदान आहे. पसायदान म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी विश्वात्मक देवाला केलेली प्रार्थना. आपली वैयक्तिक इच्छा पूर्ण व्हावी म्हणून आपण नेहमीच प्रार्थना करतो. अशी प्रार्थना आपल्यापुरती मर्यादित असते; परंतु संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाला सारे जग सुखी करण्याची प्रार्थना केली.

संत ज्ञानेश्वर 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सांगून पूर्ण करण्याच्या तयारीत होते, तेव्हा संत निवृत्तीनाथ त्यांना म्हणाले, ''आपण ग्रंथ पूर्ण करत आला आहात. तेव्हा सगळ्यांसाठी देवाजवळ काहीतरी मागा'', यावर संत ज्ञानेश्वर म्हणाले, ''मी देवापाशी आधी मागितले आहे. ते, म्हणजे देवाने आम्हा सर्वांना चांगली बुद्धी द्यावी.'' संत निवृत्तीनाथ म्हणाले, ''ग्रंथाचा समारोप करताना प्रार्थना येणे आवश्यक आहे. तुम्ही सुरुवातीला मंगलाचरणात जे म्हटले आहे ते आता विस्ताराने सांगा.'' यातून पसायदान निर्माण झाले.

संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेली ही प्रार्थना मराठी मनाच्या स्मरणात कायम आहे. पसायदान याचा अर्थ विनम्र मनाने परमेश्वराला हात जोडून केलेली प्रार्थना. निसर्गातील फुले, फळे, वृक्ष, नद्या, निर्झर, समुद्र, सूर्य, चंद्र, तारे एकोप्याने राहतात. त्यांचा दाखला देत, 'आपणही गुण्यागोविंदाने राहावे', हे संत ज्ञानेश्वरांनी सांगितले. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले आहे,

**'जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।**
**भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।**
**दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।**
**जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।**

माणसाने आपल्या मनातील दुष्टावा नाहीसा केला पाहिजे. संत ज्ञानेश्वरांनी याला 'खळांची व्यंकटी सांडो' असे म्हटले आहे किंवा **'दुरिताचें तिमिर जावो'** असे म्हटले आहे. दुरित म्हणजे दुष्कर्म. या जगातून दुष्कर्माचा अंधार नाहीसा होवो, ज्याला जे जे हवे ते ते मिळो अशी विश्वकल्याणाची प्रार्थना त्यांनी केली. असेच मागणे संत नामदेवांनीही परमेश्वराकडे मागितले. एका अभंगात ते म्हणतात,

**'अहंकाराचा वारा न लागो राजसां ।**
**माझ्या विष्णुदासां भाविकांसी ।।'**

संत नामदेवांनी देवाला अशी विनंती केली आहे, की देवा मला सतत नम्र राहू दे. मला कधीही अहंकारी होऊ देऊ नकोस. माणसात उर्मटपणा आला तर तो कधीही यशस्वी होत नाही. आपल्याला आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर नम्र राहायला हवे. विनम्रता केव्हाही जगाला आपलेसे करते. थोरांची चरित्रे आपल्याला हेच शिकवतात.

संत एकनाथांनी **'सर्वांभूती भगवद्भावो । हा चि निजभक्तीचा ठावो ।'** असे म्हटले आहे. प्राणिमात्रात मैत्री असली, की विश्व आनंदाने राहू शकते. मैत्री म्हणजे नुसते देणे घेणे नव्हे. मानवी सुखदु:खाशी सहृदय मनाने समरस होणे, दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे, दुसऱ्याच्या दु:खात त्याला आधार देणे, हा आपला आणि तो परका असे मनात कधीही न आणणे; असे झाले तरच जीवाचे मैत्र होते. संत एकनाथ 'सर्वांभूती भगवद्भावो ।' असे म्हणतात तर संत ज्ञानेश्वर यासाठी **'भूतां परस्परें पडो, मैत्र जीवाचें'** असे म्हणतात.

संत तुकारामांनी देवापाशी **'संतसंग देईं सदा'** असे मागणे मागितले आहे. संतांच्या संगतीमुळे चार माणसे एकत्र आली, तर चांगल्या प्रकारचे काम उभे राहते. परस्पर सहकार्यातूनच मानवी जीवनाचे कल्याण होते. त्यासाठी संत तुकाराम महाराज सांगतात, **'एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ।'** संत स्वत:साठी काहीही मागत नाहीत. जगाच्या कल्याणासाठीच ते प्रार्थना करत असतात.

संत रामदास यांनीही विश्वकल्याणासाठी प्रार्थना केली आहे.

**'कल्याण करीं देवराया, जनहेत विवरीं ।**
**तळमळ तळमळ होतचि आहे, हे जन हातीं धरीं ।**

संत रामदास यांना जनहिताची तळमळ वाटते, म्हणून ते परमेश्वराजवळ सर्वांचे कल्याण कर, असे मागणे मागतात.

संत गाडगे महाराजांनी सामाजिक प्रबोधन करताना प्रत्यक्ष कृतीवर भर दिला आहे. वेळ वाया घालवणे, व्यर्थ गप्पा मारत बसणे हे संत गाडगे महाराजांना मान्य नव्हते. त्यापेक्षा सर्वांनी शिक्षित व्हावे यावर त्यांचा कटाक्ष होता.

शिक्षणाचे महत्त्व सांगताना संत गाडगे महाराज म्हणतात–

**'नको धर्मकृत्ये पैसा खर्चूनिया**
**घेण्यासाठी विद्या तोच खर्चा ।।**
**स्वत:चा उद्धार करा प्रयत्नाने**
**शक्तीने, मुक्तीने सुखी व्हावे ।।'**

शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत व्हावा, माणूस जोडला जावा, त्यातून मानवाचे कल्याण व्हावे, हेच संत गाडगेबाबांना अभिप्रेत आहे.

संत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेत स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. आपले गाव हे देवाचे मंदिर आहे. अशा मंदिरात 'मानव देवमूर्ति सुंदर' असे ते म्हणतात. समभावाने सेवा केली पाहिजे, अज्ञान नाहीसे व्हावे यासाठी ज्ञानविज्ञानाची कास धरावी, सर्वांनी ग्रंथ वाचावे, सत्य बोलावे असे तुकडोजी महाराज म्हणतात. संत तुकडोजी महाराज अशी प्रार्थना करतात, की

**‘सर्व विश्वचि व्हावे सुखी । ही धर्माची दृष्टि नेटकी ।**
**ती आणावी सर्व गावलोकी । तरीच लाभ ।।**

सर्व संतांनी मागितलेले मागणे म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी केलेली चिरंजीव प्रार्थना आहे. ही प्रार्थना मानवतेची पूजा करणारी आहे. संतांनी माणसाला महत्त्व दिले. माणूस आदर्श व्हावा, त्याने सुसंस्कारांची जोपासना करावी. कुणालाही त्रास देऊ नये, एकोप्याने राहावे. माणूस कधीही एकाकी राहू शकत नाही. त्याला संवादाची नितांत गरज असते, म्हणून माणसाने कुणालाही दुखवता कामा नये. शक्यतो दुसऱ्याच्या उपयोगी पडणे, ही खरी मानवता आहे. संतांनी ही मानवता आवर्जून शिकवली. तशी त्यांनी आचरणातही आणली.

आजच्या विज्ञानयुगात विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधनामुळे विश्व जवळ आले आहे. संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात ‘हे विश्वचि माझे घर आहे,’ ही कल्पना केली होती याचे प्रत्यंतर आज आपण घेत आहोत. आज आपण जगात कुठेही जाऊ शकतो; पण संत ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेला माणसामाणसांना जोडणारा जिव्हाळा आज हरवला आहे. तो जपण्यासाठी मन सुसंस्कृत असायला हवे. नाहीतर, राक्षसी वृत्ती निर्माण होते. ती संतांना नको आहे. चांगल्या मनाने निर्माण केलेल्या कृती जगात महत्त्वपूर्ण ठरतात. विज्ञानातील चांगले प्रकल्प समृद्धी आणतात; पण सुंदर मने ही राष्ट्राची श्रीमंती वाढवतात. संतांनी याकडे लक्ष वेधले आहे.

वडाचे झाड कायम नम्र असते. ते सगळ्यांना सावली देते. त्याची सावली सर्वांना हवीहवीशी वाटते. झाडे स्वत: ऊन सोसतात. लोकांना सावली देतात. पर्वताच्या कुशीत जन्मलेल्या नद्या मोकळ्या मनाने पुढे वाहतात. पर्वत आपल्या जागी स्थिर राहून हे आनंदाने पाहतात. आपण कोणत्याही कामात मन आनंदी ठेवून जर काम केले, तर त्याच्यासारखा दुसरा आनंद नसतो. हे जगण्याचे खरे सूत्र आहे. स्वत: चांगले जगावे आणि स्वार्थापलीकडे जाऊन दुसऱ्याचाही विचार करावा; असे झाले तरच सुंदर समाज निर्माण होईल, सुखी होईल. हेच सर्व संतांच्या प्रार्थना करण्यामागील मर्म आहे.

## कृती

**(१) खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) संत ज्ञानेश्वर यांनी मानवाच्या कल्याणासाठी केलेली विश्वप्रार्थना- [ ]

(आ) मानवी सुखदु:खाशी सहृदयतेने समरस होणे- [ ]

(इ) ‘सर्वांभूती भगवद्भावो’ अशी प्रार्थना करणारे संत- [ ]

(ई) सामाजिक प्रबोधनावर भर देणारे संत- [ ]

(उ) संत तुकारामांचे जीवनसूत्र- [ ]

**(२) आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **अपयशी माणसासाठी संतांनी केलेले मार्गदर्शन**

[ ] [ ] [ ] [ ]

(आ) **संतांना माणसाकडून अपेक्षित असलेल्या आदर्श कृती**

(इ) संतांनी सांगितलेले मैत्रीचे निकष

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

(३) फरक सांगा

| सामान्य माणसाचे मागणे | संतांचे मागणे |
|---|---|
| (अ) | (अ) |
| (आ) | (आ) |

(४) खालील काव्यपंक्तींचा अर्थ लिहा.

(अ) जे खळांची व्यंकटी सांडो

(आ) दुरिताचें तिमिर जावो

(५) खालील तक्ता पूर्ण करा. त्यासाठी कंसातील शब्दांचा उपयोग करा.

(नम्रता, मैत्रभाव, विश्वकल्याण, स्वप्रयत्न, सहकार्य)

| अ. क्र. | काव्यांश | संतांचे नाव | काव्यांशातून व्यक्त झालेली संतांची इच्छा/भावना |
|---|---|---|---|
| (१) | 'सर्व विश्वचि व्हावे सुखी' | ...................................... | ...................................... |
| (२) | 'अहंकाराचा वारा न लागो राजसां' | ...................................... | ...................................... |
| (३) | 'सर्वांभूती भगवद्भावो' | ...................................... | ...................................... |
| (४) | 'एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ' | ...................................... | ...................................... |
| (५) | 'स्वत:चा उद्धार करा प्रयत्नाने' | ...................................... | ...................................... |

(६) स्वमत.

(अ) सर्व संतांच्या प्रार्थनेमधील सामाईक सूत्र तुमच्या शब्दांत थोडक्यात लिहा.

(आ) 'भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(इ) या पाठातून तुम्ही काय शिकलात, ते तुमच्या शब्दांत लिहा.

## भाषाभ्यास

- **खालील ओळींतील वृत्त ओळखा.**

(अ) म्हणे वासरा । घात झाला असा रे
तुझ्या माऊलीचेच हे खेळ सारे
वृथा धाडिला राम माझा वनासी
न देखो शके त्या जगज्जीवनासी

(आ) अविरत पथि चाले, पांथ नेमस्त मानी
कधि न मुळि न थांबे, कोणत्या कारणांनी
वचनि मननि त्याच्या, ध्येय हे एक ठावे
स्वपर जनसमूहा सौख्य कारी बनावे

(इ) मातीत ते पसरले अति रम्य पंख ।
केले वरी उदर पांडुर निष्कलंक ।।
चंचू तशीच उघडी पद लांबवीले ।
निष्प्राण देह पडला श्रमही निमाले ।।

DE3Y1X


## ❀ व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन)

इयत्ता नववीमध्ये आपण विश्वकोशाची ओळख करून घेतली. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात हे आपण अनुभवले. हे शब्द तयार कसे होतात किंवा कसे तयार झाले असावेत, याची उत्सुकता आपल्या सर्वांच्या मनात असते. शब्दाची व्युत्पत्ती पाहणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीने आपल्या मुलीचे नाव 'सई' ठेवले. 'सई' हा शब्द संस्कृतमधील 'सखी' म्हणजे मैत्रीण या शब्दावरून आलेला आहे. हे कळल्यावर त्याला किती आनंद होईल! आपल्या परिचयाच्या शब्दांची व्युत्पत्ती कळल्यावर जो आनंद मिळतो तो विद्यार्थ्यांनाही मिळावा. व्युत्पत्ती कोशाची गरज व महत्त्व कळावे व शब्दांची व्युत्पत्ती अभ्यासण्याची सवय लागावी या हेतूने स्थूलवाचन विभागात समावेश असलेला हा पाठ महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना भाषेच्या प्रवाहात येणाऱ्या अनेक शब्दांच्या उच्चारांचे व अर्थांचे मूळ व्युत्पत्ती कोशाच्या अभ्यासातून उलगडतात. शब्द हा एकच असतो व तो निरनिराळ्या परिस्थितींमध्ये निरनिराळी रूपे धारण करतो व त्या प्रत्येक रूपाला एक किंवा अनेक अर्थ प्राप्त होतात, हे विद्यार्थ्यांना समजणे हा या पाठाचा उद्देश आहे.

**खालील संवाद वाचा.**

**राधा** : आई, हे काय आहे गं कोपऱ्यात?

**आई** : अगं, ती सतार आहे. ती आजोबांना इनाम म्हणून मिळालीय महाराजांकडून! गावाकडे होती, ती आज आणली आहे.



**राधा** : इनाम... ? इनाम म्हणजे काय गं आई?

**आई** : (हसून) अगं, इनाम म्हणजे बक्षीस!

**राधा** : अगं, माझ्या वर्गातील तनया आहे ना... तिचे आडनाव आहे 'इनामदार'.

**आई** : हो...मला माहीत आहे ती.

**राधा** : इनाम म्हणजे बक्षीस. मग इनामदार म्हणजे...आईऽऽ कसा झाला असेल गं हा शब्द तयार?

**आई** : थांब. आजोबांच्या खोलीत मराठी व्युत्पत्ती कोश आहे. आपण पाहूया हं त्यात 'इनाम' शब्द कसा तयार झाला असेल? त्याची व्युत्पत्ती आपल्याला त्यात सापडेल.

> **इनाम** न. कायमची देणगी, मोफत वतन, बक्षीस Prize, gift, inam, grant [अर. इन्+आम्=वरिष्ठाकडून देणगी]

**आई** : बघितलंस का राधा? हे इथे 'अर.' लिहिले आहे ना! म्हणजे हा अरबी भाषेतला शब्द आहे. आता आपण –दार हा प्रत्यय शोधू.

> **दार** प्र. स्वामित्वदर्शक फारसी प्रत्यय. A termination showing possession

बघ –दार हा फारसी प्रत्यय आहे. स्वामित्वदर्शक म्हणजे एखादी गोष्ट एखाद्याजवळ आहे असे दर्शवणारा प्रत्यय. इथे 'इनामदार' म्हणजे 'ज्याच्याजवळ इनाम आहे तो' असा अर्थ होतो आणि दार म्हणजे एखादी गोष्ट धारण करणारा असा पण अर्थ घेता येईल. 'जबाबदार' हा शब्द तुला माहीत आहे ना! जो जबाबदारी धारण करतो किंवा घेतो, ज्याच्याकडे जबाबदारी असते तो जबाबदार. तसंच 'इनामदार' म्हणजे ज्याच्याजवळ इनाम आहे किंवा ज्याने इनाम धारण केलेले आहे म्हणजेच ज्याला इनाम मिळालेले आहे असा माणूस.

**राधा** : आई, ही माहिती किती छान आहे! आता मी नेहमी असे शब्द शोधत जाईन.




व्युत्पत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान. एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे म्हणजे व्युत्पत्ती सांगणे. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश.

भाषेत अनेक कारणांनी बदल होत जातात. व्युत्पत्ती कोशात या बदलाचे मूळ आपल्याला शोधता येते.

उदा., भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने जे फरक होतात ते भिन्न भिन्न काळांतील भाषा बोलणाऱ्यांच्या शब्दांच्या उच्चारांचे व समाजामध्ये वापरात असलेल्या शब्दांच्या होणाऱ्या अर्थोचित बदलांचे परिणाम आहेत. व्युत्पत्ती कोश या बदलाचे स्वरूप स्पष्ट करतो.

उदा., मराठीतील 'आग' हा शब्द 'संस्कृत'मधील 'अग्नि' पासून आला, हे आपल्याला व्युत्पत्ती कोशामुळे कळते. भाषेत बदल होण्यामागे बऱ्याचदा सुलभीकरणाची म्हणजे सोपे करण्याची प्रवृत्ती असते.

उदा., 'अग्नि' पासून 'आग' हा शब्द तयार होण्यापूर्वी प्राकृतमध्ये 'अग्गि' हा शब्द तयार झाला. हा उच्चार सोपा होत होत मराठी, हिंदी यांसारख्या आधुनिक भाषांत त्यापासून 'आग' हा शब्द तयार झाला. कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते (कधी कधी व्याकरणिक घटकांचीही देवघेव होते.) या सर्वांची नोंद व्युत्पत्ती कोशामध्ये पाहायला सापडते. शब्दसिद्धीमध्ये आपण हे पाहतोच.

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | तोंड |
| कन्नड | तुप्प | तूप |
| अरबी | इत्र | अत्तर |

काळाप्रमाणे शब्दांच्या स्वरूपात, त्यांच्या अर्थात, त्यांच्या परस्परसंबंधात बदल होतात आणि हे बदल अपरिहार्य असतात. निरीक्षण करा, तुमचे आजी–आजोबा बोलत असलेली भाषा, तुमचे आई–बाबा बोलत असलेली भाषा, तुम्ही आणि तुमच्या भावंडांची भाषा, तुम्ही आणि तुमच्या मित्रांमधील भाषा. (उदा., व्हॉटस्ॲपची भाषा) या सगळ्यांत खूप फरक आहे हे तुमच्या लक्षात आलंच असेल. कधी कधी पूर्वी अस्तित्वात असलेल्या एखाद्या शब्दाचा अर्थ हळूहळू बदलत जातो किंवा मूळ अर्थाबरोबरच आणखी एखादा अर्थ भाषेमध्ये स्थिरावत जातो. उदा., 'शहाणा' या शब्दाचा अर्थ पूर्वी हुशार, बुद्धिमान, चलाख असा होता हा शब्द सज्ञान या शब्दावरून आला असावा असे व्युत्पत्ती कोशावरून दिसते. आता मूळ अर्थाव्यतिरिक्त 'शहाणा'चा 'अतिशहाणा' असा अर्थसुद्धा रूढ होत आहे. काही काळाने याची नोंद व्युत्पत्ती कोशात दिसण्याची शक्यता आहे.

एकाच अर्थाचे शब्द निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळी रूपे धारण करतात. उदा.,

| शब्द अनेक | अर्थ एक | वेगवेगळ्या संदर्भांत वापर |
|---|---|---|
| वात, पवन, मरुत, समीर, अनिल | वारा | पवनचक्की ✓<br>वातचक्की ✕ अनिलचक्की ✕ |
| | | वातचक्र ✓ समीरचक्र ✕ |

तसेच समान दिसणाऱ्या शब्दाचे अर्थ वेगवेगळे असतात.

| शब्द एक | वेगवेगळे अर्थ |
|---|---|
| पाठ | (१) माझी 'पाठ' दुखते आहे. पाठ – शरीराचा अवयव<br>(२) हा 'पाठ' सोपा आहे. पाठ–पुस्तकातील धडा |

## व्युत्पत्ती कोश कसा पाहावा?

आपल्याला एखाद्या शब्दाबद्दल कुतूहल निर्माण झाले, तर आपण व्युत्पत्ती कोश पहातो. उदा., 'दिवाळी' हा शब्द कुठून आला असेल?



**दिवाळी** स्त्री. दिव्यांची रांग, एक सण (दिव्यांसंबंधी)
A row of lights (hence) a Hindu Festival with nocturnal illuminations.
[सं. दीपावलि, दीपालि; प्रा. दिवाली, दीवावली, बं. दिउयाली; ओ. दिआली; हिं/पं. दिवाली, सिं. डिआरी, गु. दिवाळी]

'दिवाळी' हा शब्द आपण पाहिला. मूळ संस्कृत शब्द 'दीपावलि'पासून तो आला आहे. (संस्कृत शब्द 'दीपावलि'चा 'लि' ऱ्हस्व असला तरी मराठीत तो दीर्घ लिहितात. या शब्दांतील 'दी' व 'ली' दोन्ही दीर्घ आहेत; पण 'दिवाळी' हा शब्द मराठी आहे. त्यात 'दि' हा ऱ्हस्व येतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.) विश्वकोशातील या शब्दाची नोंद पाहिल्यावर कंसातील मजकूर पाहताना हे नक्की काय आहे असे तुम्हांला वाटले असेल; पण ही शब्दांची लघुरूपे आहेत हे कळल्यावर आणि त्यांची मूळ रूपे समजल्यावर तुम्हांला ते सोपे वाटेल आणि आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांच्या अंगणातही बागडतो आहे हे कळल्यावर मजाही वाटेल.

व्युत्पत्ती कोशात अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे, हेही दाखवलेले असते. वरच्या उदाहरणात शब्दांची लघुरूपे आलेली आहेत ती जाणून घेणे आवश्यक आहे. शब्दात सुरुवातीला शब्दाची जात लिहिलेली असते. नामाच्या बाबतीत मात्र पुं.-पुल्लिंगी, स्त्री.- स्त्रीलिंगी, न/नपुं.-नपुंसकलिंगी असे लिहिलेले असते. 'दिवाळी' हा स्त्रीलिंगी शब्द असल्याने 'स्त्री.' हे लघुरूप पाहायला मिळते. त्यानंतर वेगवेगळ्या भाषांसाठी लघुरूपे वापरलेली दिसतात. सं-संस्कृत, प्रा-प्राकृत, बं-बंगाली, ओ-ओडिया, हिं-हिंदी, पं-पंजाबी, सिं-सिंधी, गु-गुजराती. या व्यतिरिक्त कोशकार कधी एखाद्या शब्दामागचा इतिहास सांगतात. कधी कधी एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली वेगळी व्युत्पत्ती सांगून ती आपल्याला योग्य वाटते की नाही हेही सांगतात.

**व्युत्पत्ती कोशाचे कार्य**

- (१) शब्दाचे मूळ रूप दाखवणे.
- (२) अर्थांतील बदल स्पष्ट करणे.
- (३) उच्चारातील बदल व फरक दाखवणे.
- (४) बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(यांपैकी पहिल्या दोन बाबींचा अगदी थोडक्यात, सोदाहरण परिचय पाठात आला आहे.

**लक्षात ठेवा.**

(१) १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.
(२) स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते.
(३) 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे', असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला.
(४) कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर या कार्याची जबाबदारी सोपवण्यात आली.
(५) बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली.
(६) १९४६ साली या मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले. यानंतरही व्युत्पत्ती कोशाच्या आवृत्त्या निघालेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्या जरूर पाहाव्यात.

● **ताकास तूर लागू न देणे हा वाक्प्रचार कसा आला असावा हे आपण समजून घेऊया.**

शाळेत नाटक बसवले जाणार होते. नाटकात काम करणाऱ्यांमध्ये शरदची निवड झाली होती. मित्र त्याच्याकडून ही बातमी काढून घेण्यासाठी खूप प्रयत्न करत होते; पण शरदने ताकास तूर लागू दिली नाही. अशा प्रकारचे प्रसंग आपल्यावरही अनेकदा येत असतात. आपणही आपल्या मनात काय आहे हे लोकांना अजिबात कळू देत नाही. लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना आपण अशी काही उत्तरे देत राहतो, की त्यांना काही कळूच नये. लोकही मग म्हणतात, ''अरे, हा अगदी ताकास तूर लागू देत नाही की!''

आता 'ताकास तूर लागू न देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ आपल्याला कळला आहेच. कोशातही त्याचा अर्थ ''(एखाद्या गोष्टीचा दुसऱ्यास) बिलकूल थांग लागू न देणे; टाळाटाळी करून स्वत:च्या मनातील विचार दुसऱ्यास न समजू देणे'' अशाच प्रकारचा आहे. पण ताकास तूर लागणे म्हणजे काय! ताक म्हणजे काय? आपण पितो ते ताक? आणि तूर म्हणजे तरी काय? आपल्या मराठी लोकांच्या जेवणात ज्या तुरीच्या डाळीचं वरण असतं ते तूर नावाचं धान्य की काय? ताकाचा अन् तुरीचा संबंध येतो तरी कुठे? येथील शब्द 'ताक' असा नसून 'ताका' असा आहे आणि 'ताका' म्हणजे 'तागा'. 'तागा'चा अर्थ 'मराठी व्युत्पत्ती कोशा'मध्ये कृ. पां. कुलकर्णी यांनी (१) नव्या (अखंड) कापडाचा गठ्ठा; किंवा (२) (विणकराच्या) मागावरील सबंध न फाडलेले (कापडाचे) ठाण असा दिलेला आहे. 'महाराष्ट्र शब्दकोशा'च्या चौथ्या विभागात देखील असा अर्थ दिलेला आहे.

ताका-गा : मागावरील संबंध न फाडलेले कापड; (कापड इत्यादिकांचे) ठाण. (२) दोरा, धागा.

आता 'तूर' या शब्दाचा 'महाराष्ट्र शब्दकोशा'तला अर्थ पाहू. 'तूर' म्हणजे एक प्रकारचं द्विदल धान्य हा अर्थ तर आहेच. पण या शब्दाला दुसराही एक अर्थ आहे. तो असा-

तूर : विणलेले वस्त्र ज्या लाकडाभोवती गुंडाळले जाते ते लाकूड; कोष्ट्याची दांडी

कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या 'मराठी व्युत्पत्ती कोशा'त तूरचा असाच अर्थ दिलेला आहे.

तर 'ताका' (किंवा 'तागा') आणि 'तूर' या शब्दांचे आपल्याला नेहमी माहीत असलेले अर्थ न घेता इथे हे विणकराच्या व्यवसायातले अर्थच ध्यानात घ्यायला हवेत. कारण विणकराच्या मागावरचा ताका किंवा तागा हा वास्तविक 'तुरे'वर म्हणजेच लाकडाभोवती गुंडाळला जायला हवा. पण 'ताका'चा 'तूर' नामक वस्तूशी संबंधच येऊ द्यायचा नाही. ताका व तूर यांचा संबंध टाळायचा. म्हणजे कापड आणि ज्या लाकडाभोवती ते गुंडाळायचे ते लाकूड यांचा संबंध टाळायचा; म्हणजे जे काम खरोखर अपेक्षित असते, व्हायला हवे असते, होणे रास्त असते, तेच मुद्दाम होऊ द्यायचे नाही, असा याचा अर्थ आहे.

**('गंमत शब्दांची' डॉ. द. दि. पुंडे या पुस्तकातून)**

## कृती

**(१) टिपा लिहा.**

(अ) व्युत्पत्ती कोशाचे कार्य

(आ) शब्द तयार होण्याचे विविध प्रकार

**(२) खालील मुद्द्यांच्या आधारे एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**

**व्युत्पत्ती कोश**
- → निर्मितीचा ठराव
- → निर्मितीची जबाबदारी
- → निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- → त्याचे प्रकाशन

**(३) पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा.**

**व्युत्पत्ती कोश**

**शब्द अनेक, अर्थ एक**

उदा., जल, नीर, तोय...
–पाणी

**शब्द एक, अर्थ अनेक**

उदा., पान–
पान–झाडाचे पान (पर्ण)
पान–पुस्तकाचे पान (पृष्ठ)

**उपक्रम :** शिक्षकांच्या मदतीने व्युत्पत्ती कोशातून खालील शब्दांची व्युत्पत्ती शोधून लिहा.

(अ) प्रावीण्य

(आ) चिल्लर

(इ) वीज

(ई) गुपचूप

## भाषासौंदर्य

### अशी पडते भाषेत शब्दांची भर

कोणतीही भाषा समृद्ध होते  ती त्या भाषेच्या वाढणाऱ्या शब्दसंपत्तीमुळे. भाषेमध्ये इतर भाषा व व्यवहार यांतून शब्दांची भर पडत असते. मराठी भाषेमध्येही अशा विविध प्रकारांनी शब्दांची भर कशी पडते, ते खालील उदाहरणांद्वारे अभ्यासा.

**दुसऱ्या भाषेच्या संपर्कातून.**
उदा., इंग्रजीतून आलेले ऑफिस, पेन, टेबल इत्यादी शब्द.

**दुसऱ्या भाषेतल्या शब्दांच्या वेगळ्या उच्चारांतून.**
उदा., 'डॅम बीस्ट' याचे जुन्या मराठीतले 'डँबीस' हे रूप

**दोन वेगवेगळ्या भाषांतील शब्द आणि प्रत्ययांचे मिश्रण करून.**
उदा., फारसी ना हा उपसर्ग + पास हा इंग्रजी शब्द = नापास

**प्रत्यय आणि उपसर्ग लागून.**
उदा., वारकरी, प्रतिसाद,

भाषेमध्ये भर घालणाऱ्या अशा अनेक शब्दांचा शोध घ्या व त्यांचा संग्रह करा.

❀❀❀

YC2RQ8

## शब्दसिद्धी

आपल्या भाषेत आलेले शब्द मूळचे कुठल्या भाषेतले आहेत याचा शोध घेणे म्हणजे त्या शब्दाची व्युत्पत्ती शोधणे. व्युत्पत्ती आपल्याला व्युत्पत्ती कोशात शोधता येते; पण कोणते शब्द आपण इतर भाषांतून जसेच्या तसे घेतले, कोणत्या शब्दात बदल करून आपण नवीन शब्द घडवला याचा अभ्यास म्हणजे शब्दसिद्धी. शब्द कसा तयार होतो, सिद्ध होतो याचा अभ्यास म्हणजे शब्दसिद्धी होय.

भाषेतल्या शब्दाचे वर्गीकरण दोन प्रकारे करता येते.

(१) **सिद्ध शब्द–** उदा., जा, ये, कर, बोल सारखे मूळ धातू किंवा शब्द.

(२) **साधित शब्द–** उदा., 'कर'सारख्या सिद्ध शब्दापासून तयार झालेले करू, कर्ता, करणारा, होकार, प्रतिकार इत्यादी शब्द.

### भाषेतील शब्द

**(१) सिद्ध शब्द**

(अ) तत्सम
(आ) तद्भव
(इ) देशी
(ई) परभाषीय

**(२) साधित शब्द**

(अ) उपसर्गघटित शब्द
(आ) प्रत्ययघटित शब्द
(इ) सामासिक शब्द
(ई) अभ्यस्त शब्द

यापूर्वी आपण सिद्ध शब्द व साधित शब्द गटातील सामासिक शब्द यांचा अभ्यास केलेला आहे. आता आपण साधित गटातील 'उपसर्गघटित', 'प्रत्ययघटित' व 'अभ्यस्त' शब्दांचा अभ्यास करणार आहोत.

### (अ) उपसर्गघटित शब्द

**उपसर्ग :**

मूळ धातूच्या किंवा शब्दाच्या मागे एक किंवा अनेक अक्षरे लावून काही **'साधित शब्द'** बनतात, त्या अक्षरांना **'उपसर्ग'** असे म्हणतात.

(१) उपसर्ग स्वतंत्रपणे येत नाहीत.

(२) ही अक्षरे अव्ययरूप असतात. उपसर्ग लागल्याने कधी कधी मूळ धातूचा अर्थ बदलतो.

संस्कृत, फारसी, अरबी या भाषांतून मराठीने अनेक उपसर्ग घेतले आहेत या उपसर्गांना मराठी/इंग्रजी इत्यादी शब्द जोडून अनेक शब्द तयार झाले आहेत.

| उपसर्ग | उपसर्गघटित शब्द |
|---|---|
| अव– | अवजड, अवघड, अवकळा |
| भर– | भरजरी, भरधाव, भरदिवसा |
| नि– | निरोगी, निनावी, निकोप |
| अति– | अतिरेक, अतिशय |
| उप– | उपसंपादक, उपमुख्याध्यापक, उपप्रमुख, उपवास |
| बे– | बेडर, बेफिकीर, बेपर्वा |
| बिन– | बिनचूक, बिनतक्रार, बिनहरकत |
| ना– | नाराज, नाउमेद, नापसंत |

**(आ) प्रत्ययघटित शब्द–** शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही शब्द तयार होतात, अशा अक्षरांना 'प्रत्यय' असे म्हणतात. प्रत्यय लागून तयार झालेल्या शब्दाला '**प्रत्ययघटित**' शब्द असे म्हणतात.

| प्रत्यय | प्रत्ययघटित शब्द |
|---|---|
| –आई | खोदाई, लढाई, चढाई |
| –आऊ | टिकाऊ, जळाऊ, लढाऊ |
| –आळू | झोपाळू, लाजाळू, दयाळू |
| –दार | दुकानदार, जमीनदार |
| –गिरी | गुलामगिरी, कारागिरी, |
| –इक | मानसिक, सामाजिक, लौकिक |
| –इत | आनंदित, प्रेरित |
| –त्व | जडत्व, गुरुत्व |

**(इ) अभ्यस्त शब्द–** द्विरुक्त किंवा पुनरावृत्तीने तयार झालेले शब्द म्हणजे '**अभ्यस्त**' शब्द होय.

उदा., लाललाल, हळूहळू, तुकडेतुकडे, धंदाबिंदा, कामबीम, शेजारीपाजारी, कडकड, झटपट, खटपट इत्यादी.

- **खालील चौकटीत दिलेल्या शब्दांचे वर्गीकरण करून तक्ता पूर्ण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इनामदार | धारदार | गल्लोगल्ली | घमघम | अचूक | हुबेहूब |
| आंबटचिंबट | मुलूखगिरी | धबाधब | शिष्टाई | अनाकलनीय | हुरहुर |
| हिरवाहिरवा | मधूनमधून | रस्तोरस्ती | दांडगाई | उपाहार | तिळतिळ |
| शिलाई | लुटूलुटू | वटवट | संशयित | बेशक | मागोमाग |

| उपसर्गघटित शब्द | प्रत्ययघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| | | |

## रसग्रहण

शिशुवर्गात तालासुरात बडबडगीते म्हणणारा विद्यार्थी जेव्हा मोठा होऊ लागतो, तेव्हा लहानपणी गायलेल्या कवितांचा अर्थ त्याला कळू लागतो किंबहुना मोठ्या वर्गात वृत्त, अलंकार शिकल्यानंतर कवितेचं तंत्र कळू लागतं. कविता वाचताना त्याचं मन एका अनामिक आनंदानं भरून जातं. कधी डोळ्यांत पाणी येतं, कधी मन अंतर्मुख होतं, कधी कवितेतील व्यक्तिचित्र, घटना, नैसर्गिक सौंदर्य डोळ्यासमोर जसंच्या तसं उभं राहतं, तर कधी समाजातील वास्तवाच्या दाहक चित्रणाची जाणीव त्याला होते. या सर्व भावभावनांचा मनात चाललेला व्यापार म्हणजेच कवितेच्या आस्वादाकडे मन वळतं आहे याचं चिन्ह होय.

कृतिपत्रिकेतील पद्यविभागाच्या मूल्यमापनामध्ये कवितेचे रसग्रहण हा घटक समाविष्ट केलेला आहे. 'रस' या घटकाचा अभ्यास तुम्ही इयत्ता नववीत केलेला आहे. या इयत्तेत कवितेचे रसग्रहण करता येणे, कवितेचा आस्वाद घेता येणे, यादृष्टीने कवितांचा अभ्यास करायचा आहे.

कवितेचे रसग्रहण आशयसौंदर्य, काव्यसौंदर्य आणि भाषिक सौंदर्य (भाषिक वैशिष्ट्ये) या तीन प्रमुख मुद्द्यांना धरून केले जाते. या तीन मुद्द्यांमध्ये अगदी स्पष्ट विभाजन रेषा नसते. ते एकमेकांमध्ये मिसळून गेलेले असतात, म्हणूनच कवितेमध्ये त्यांचा एकत्रितपणे अनुभव येतो. कवितेत अल्प शब्दांतून मोठा आशय व्यक्त झालेला असतो. कवितेत अचूक आणि चपखल शब्दनिवड असते. कल्पनांच्या माध्यमातून, कधी प्रतिमांमधून तर कधी भाषिक वैशिष्ट्यांमधून कवितेचा आशय उलगडायला मदत होत असते. याशिवाय कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारणही तुम्हांला सांगता यायला हवे. याशिवाय कवितेचे खालील अंगभूत गुण तुम्हांला माहीत असायला हवेत.

(१) काव्यातील शब्द रमणीय अर्थ व्यक्त करतात.

(२) शब्द उत्कट भावनेचा सहज उद्रेक करतात.

(३) शब्दांना आंतरिक लय असते तर कधी रचनाच तालबद्ध असते.

वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन कवितेचा अभ्यास केल्यास कवितेचा आशय आणि भाषासौंदर्याचा एकत्रित अनुभव घेता येतो. लक्षात ठेवा, की संपूर्ण कवितेऐवजी कवितेतील काही ओळींचे रसग्रहण करायचे असेल तर तेही त्या मुद्द्यांना धरून करता यायला हवे. प्रत्येक ओळीच्या बाबतीत सगळेच मुद्दे लागू पडतील असे नाही; परंतु त्या ओळीतील आशयाचे काव्यसौंदर्य उलगडता यायला हवे, हे महत्त्वाचे असते.

| रसग्रहण | | |
|---|---|---|
| **आशयसौंदर्य** | **काव्यसौंदर्य** | **भाषिक वैशिष्ट्ये** |
| कवितेचा विषय, मध्यवर्ती कल्पना, संदेश, उपदेश, मूल्य, कवितेतून मिळणारा एकत्रित अनुभव | अलंकार, रस, विविध कल्पना, प्रतिमा, विविध भावना. | कवींची भाषाशैली (ग्रामीण, बोलीभाषा, संवादात्मक भाषा, निवेदनात्मक, चित्रदर्शी) शब्दालंकार, आंतरिक लय, नादमाधुर्य वृत्त (असल्यास) |

## काव्यसौंदर्य

काव्यसौंदर्याची अभिव्यक्ती म्हणजे कवितेच्या वाचनाने अथवा श्रवणाने मनावर झालेल्या संस्कारांना शब्दात्मक रूप देणे होय. कवींची मूळ संकल्पना, भावना, विचार यांच्या सजावटीसाठी कवीने केलेली विशिष्ट मांडणी, योजलेले शब्दालंकार, अवलंबलेले वृत्त त्याचप्रमाणे कवीने निर्मिलेल्या सृष्टीचे आपल्या मनावर झालेले संस्कार आणि त्यावरून आठवणारी इतर क्षेत्रांतील साम्यस्थळे यांचा एकत्रित परिणाम काव्यसौंदर्यात असतो. कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण समर्पक शब्दांत सकारण कथन करणे म्हणजे काव्यसौंदर्य जाणणे होय.

काव्यसौंदर्यामध्ये विचारसौंदर्य, आशयसौंदर्य आणि भावसौंदर्य अशा वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश असतो. कवितेत विचार, आशय आणि भाव या तीन वेगवेगळ्या संकल्पना असल्या तरी त्यांच्यातील विभाजनरेषा तितकीशी स्पष्ट नसते कारण त्या परस्पर संबंधित असतात. प्रसंगानुरूप, व्यक्तिपरत्वे या संज्ञा वापरल्या जातात. त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खाली दिलेले आहे. त्यांचा अभ्यास करा.

कवितेत कवी एखादा विषय मांडत असतो.

उदा., 'आश्वासक चित्र' या कवितेत 'स्त्री-पुरुष समानता' हा विषय मांडलेला आहे. 'आकाशी झेप घे रे' या कवितेत श्रमांच्या मूल्याचा विचार मांडलेला आहे.

कवितेत वेगवेगळ्या भावभावना प्रकट झालेल्या असतात.

उदा., 'वस्तू' या कवितेत निर्जीव वस्तूंविषयीची कवींची संवेदनशीलता प्रकट होत असते.

आता तुमच्या लक्षात येईल, की कवितेचा विषय, आशय, कवितेत मांडलेला विचार, कवितेतील मूल्य, दिलेला संदेश आणि भावभावना या सगळ्यांमधून काव्यसौंदर्य प्रकट होत असते. त्यामुळे काव्यसौंदर्याचा अभ्यास करताना प्रत्येक मुद्द्याचा विचार करावा. कृतिपत्रिकेतील काव्यसौंदर्यांतर्गत येणाऱ्या विचारसौंदर्य, भावसौंदर्य व अर्थसौंदर्य यावर आधारित कृतींचा अभ्यास खालील मुद्द्यांना धरून करावा.

| काव्यसौंदर्य | | |
|---|---|---|
| **अर्थसौंदर्य** | **विचारसौंदर्य** | **भावसौंदर्य** |
| कवितेचा विषय, कवितेची मध्यवर्ती कल्पना, आशयाला पुढे नेणारा विषय, शब्दांचा चपखल वापर, अर्थच्छटा, अलंकार इत्यादी. | कवितेतून व्यक्त होणारा विचार, कधी सर्वसमावेशक तर कधी नेहमीपेक्षा वेगळा, अनुभवांचा अंतर्मुख होऊन केलेला विचार इत्यादी. | कवितेतून व्यक्त होणारा भाव, वाच्यार्थाच्या पलीकडील भावार्थ, भावनांचा आविष्कार, संवेदनशीलता रस, कल्पना, प्रतिमा इत्यादी. |